॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

▪ अहिल्यानगर ▪ रविवार, दि. ३ मे २०२६ ▪ वर्ष ६ वे ▪ अंक ३४७ वा ▪ पाने ४ ▪ किंमत ३ रुपये ▪ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145 | www.veerbhuminews.com

✲ सुविचार ✲

एक चागंली माता
शंभर शिक्षकांच्या मोलाची असते.



नेमकी गरज न ओळखता झालेले काम म्हणजे कोपरगाव बस स्थानक

पान क्र. २ वर



दत्त मंदिर संस्थेचा आध्यात्मिक-सामाजिक कार्य गौरव सोहळा उत्साहात

पान क्र. ३ वर



'ग्रीन सिटी'सारख्या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाची व्यापक चळवळ उभारणे आवश्यक

पान क्र. ४ वर

SPOT NEWS

## दानवे, सिद्दीकी, नीलम गोऱ्हेंच्या संपत्तीत मोठी वाढ

● **मुंबई** – विधान परिषदेच्या उमेदवारांच्या संपत्तीत लक्षणीय वाढ झाल्याचे समोर आले आहे. नीलम गो–हे, अंबादास दानवे यांच्या कुटुंबाची संपत्तीही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. राष्ट्रवादीचे झिशान सिद्दीकी यांची संपत्ती अवघ्या दोन वर्षांत चौपट झाल्याचे स्पष्ट झाले. ३० एप्रिल हा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस होता. १२ मे रोजी निवडणूक होणार असून त्याच मतदानाच्या दिवशीच संध्याकाळी मतमोजणी होणार आहे. या निवडणुकीत ठाकरे गटाकडून अंबादास दानवे, तर शिवसेना शिंदे गटाकडून नीलम गोऱ्हे, बच्चू कडू आणि राष्ट्रवादीकडून झिशान सिद्दीकीला उमेदवारी देण्यात आली आहे. दरम्यान या उमेदवारांबाबत मोठी माहिती समोर आली आहे. शिवसेनेकडून पुन्हा उमेदवारी मिळालेल्या नीलम गो–हे आणि ठाकरेंच्या पक्षाचे उमेदवार अंबादास दानवे यांच्या संपत्तीत वाढ झाली आहे. तर, राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार झिशान सिद्दीकी यांची संपत्ती अवघ्या दोन वर्षांत तब्बल चारपट वाढल्याचे दिसून आले आहे. विधान परिषदेच्या विद्यमान उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्या संपत्तीत गेल्या सहा वर्षांत दहापट वाढ झाल्याचे समोर आले आहे. नीलम गो–हे यांच्याकडे २०२० साली १.५७ कोटी रुपयांची जंगम मालमत्ता होती तर स्थावर मालमत्तेचे मूल्य सहा कोटी रुपयांच्या घरात होते. तर आता (२०२६ साली) नीलम गो–हे यांची जंगम मालमत्ता ११.६६ कोटी रुपये झाली आहे. त्यांनी स्थावर मालमत्तेत ७.६९ कोटी रुपयांची स्वअर्जित तर १२.७६ कोटी रुपयांची वडिलोपार्जित मालमत्ता जाहीर केली आहे. गोऱ्हे यांच्याकडे टोयोटा तर शिवसेना ठाकरे गटाकडून अंबादास दानवे यांना पुन्हा उमेदवारी दिली असून त्यांच्या संपत्तीतही भरघोस वाढ झाल्याचे दिसून आले आहे. २०१९ साली दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार दानवे यांची कुटुंबाची मिळून ६३.७८ लाख रुपयांची जंगम संपत्ती होती. मात्र आता पुन्हा उमेदवारी मिळाल्यानंतर दानवे यांनी गुरुवारी प्रतिज्ञापत्र दाखल केले. त्यानुसार, (२०२६ साली) दानवे यांच्या कुटुंबीयांची मिळून २.३६ कोटी रुपयांची जंगम संपत्ती तर ५.०६ कोटी रुपये किमतीची स्थावर मालमत्ता आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून झिशान सिद्दीकी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. झिशान सिद्दीकी यांनी २०२४ मध्ये विधानसभा निवडणूक लढवली होती, तेव्हा ५.२० कोटी रुपयांची जंगम मालमत्ता व ३१.६९ कोटी रुपयांची स्थावर मालमत्ता असल्याचे, त्यांनी त्यावेळी जाहीर केले होते. तर आपल्यावर ८.७७ कोटी रुपयांचे कर्ज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले होते. मात्र २०२६ मध्ये त्यांच्या संपत्तीत २ वर्षांत जवळपास चौपट वाढ झाल्याचे दिसून आले आहे. सिद्दीकी यांनी २१.१७ कोटी रुपयांची जंगम मालमत्ता जाहीर केली आहे.

# अहिल्यानगरचा बारावीचा निकाल ९०.३२ टक्के

## पुणे विभागात दुसऱ्या स्थानी । यावर्षीही मुलींची टक्केवारीत बाजी

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेत मागील वर्षीच्या तुलनेत यंदा नगर जिल्ह्याचा निकाल ४ टक्क्यांनी वाढला आहे. यावर्षीचा निकाल ९०.३२ टक्के लागला आहे. विज्ञान शाखेचा निकाल ९६.५५ टक्के, कला शाखेचा निकाल ७५.५९ टक्के तर वाणिज्य शाखेचा निकाल ८५.२६ टक्के इतका लागला. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही मुलींनीच बाजी मारली आहे.

मंडळातर्फे बारावीचा निकाल शनिवारी दुपारी १२ वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात आला. यावर्षी जिल्ह्यातून बारावीची परीक्षा ३१ हजार ९२४ मुले व २६ हजार ९७१ मुली अशा एकूण ५८ हजार ८९५ विद्यार्थ्यांनी दिली. त्यातून २७ हजार ६९४ मुले (८६.७४ टक्के) व २५ हजार ५०२ मुली (९४.५५ टक्के) असे एकूण ५३ हजार १९६ विद्यार्थी (९०.३२ टक्के) उत्तीर्ण झाले. मागील वर्षी पुणे विभागात नगर जिल्हा तिसर्या स्थानी गेला होता. यंदा मात्र तो दुसर्या स्थानावर आहे. जिल्ह्यात जामखेड तालुक्याचा निकाल सर्वाधिक ९७.२९ टक्के लागला. त्यानंतर संगमनेर (९५.०१ टक्के) व श्रीगोंदा (९४.८९ टक्के) तालुक्यांचा क्रमांक लागतो. सर्वांत कमी निकाल शेवगाव (८३.९२ टक्के) तालुक्याचा लागला.

यावर्षी बारावीच्या परिक्षेला ३१ हजार ९२४ मुले परिक्षेला बसले होते. त्यापैकी २७ हजार ६९४ उत्तीर्ण झाले असून त्याची टक्केवारी ८६.७४ टक्के इतकी आहे. तर २६ हजार ९७१ मुली परिक्षेस बसल्या होत्या त्यापैकी २५ हजार ५०२ उत्तीर्ण झाल्या असून त्याची टक्केवारी ९४.५५ टक्के इतकी आहे.

यावर्षी प्रथमच गुणपत्रिका आणि प्रमाणपत्र निकाल लागल्यापासून १५ व्या दिवशी एकाच वेळी शाळांमध्ये उपलब्ध करून दिले जाणार आहे. पेपर वाहतुकीसाठी जीपील एनेबल डिजिटल लॉक सिस्टिमचा यशस्वी वापर करण्यात आला.कॉपीमुक्त अभियान: कडक निर्बंधांमुळे यावर्षी निकालात काही प्रमाणात घट झाली आहे. परीक्षेदरम्यान १ हजार ९८३ गैरप्रकार आढळले असून १०० कर्मचार्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात



आली आहे. खेळाडू, एनसीसी, स्काऊट आणि गाईड विद्यार्थ्यांना शासन निर्णयानुसार सवलतीचे गुण देण्यात आले आहेत. जे विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहेत त्यांच्यासाठी जून–जुलै २०२६ मध्ये पुरवणी परीक्षा घेतली जाईल, असे शिक्षण मंडळाकडून जाहीर करण्यात आले.

निकालानंतर ज्या विद्यार्थ्यांना आपल्या गुणांची पडताळणी करायची आहे किंवा उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत हवी आहे, त्यांच्यासाठी रविवार ३ मे ते १७ मे २०२६ या कालावधीत मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून दिली आहे. गुण पडताळणीसाठी प्रति विषय ५० रुपये, तर छायांकित प्रतीसाठी प्रति विषय ४०० रुपये शुल्क ऑनलाइन भरावे लागेल. उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करू इच्छिणार्या विद्यार्थ्यांना प्रथम छायांकित प्रत घेणे अनिवार्य असून त्यानंतर पुढील ५ दिवसांत ३०० रुपये प्रति विषय शुल्क भरून अर्ज करता येईल. जेईई आणि नीट यांसारख्या स्पर्धा परीक्षा देणार्या विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांच्या अर्जांना प्राधान्य दिले जाणार आहे. जे विद्यार्थी या परीक्षेत उत्तीर्ण होऊ शकले नाहीत, त्यांच्यासाठी जून–जुलै २०२६ मध्ये पुरवणी परीक्षा आयोजित केली जाणार आहे.

### सर्वाधिक निकाल संगमनेर, जामखेडचा

▪ अकोले ८६.७८ टक्के, जामखेड ९७.२९ टक्के, कर्जत ८९.८२ टक्के, कोपरगाव ९०.९६ टक्के, नगर ८९.८६ टक्के, नेवासा ९०.८६ टक्के, पारनेर ९१.९४ टक्के, पाथर्डी ८६.२५ टक्के, राहाता ९१.५९ टक्के, राहुरी ८८.७३ टक्के, संगमनेर ९५.०१ टक्के, शेवगाव ८३.९२ टक्के, श्रीगोंदा ९४.८९ टक्के आणि श्रीरामपूर ८६.०८ टक्के एकूण ९०.३२ टक्के.

## गदेवाडी येथील वीजउपकेंद्रातील चोरीचा पर्दाफाश; स्थानिक गुन्हे शाखेकडून तिघांना अटक

● **शेवगाव । वीरभूमी–**

तालुक्यातील गदेवाडी येथील एमएसईबी सबस्टेशनमध्ये झालेल्या जबरी चोरी प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेने तीन आरोपींना अटक करत तब्बल ५ लाख ७२ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. भिमा लक्ष्मण म्हस्के (वय ३८), अविनाश कल्याण धुरंधरे (वय ३७) व अमोल गणेश रांजवण (वय ३६, सर्व रा. बीड), असे ताब्यात घेतलेल्या संशयित आरोपीचे नाव आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, २२ एप्रिल २०२६ रोजी मध्यरात्री सुमारे १२.१५ वाजण्याच्या सुमारास चार अज्ञात चोरट्यांनी चापडगाव येथील एमएसईबी सबस्टेशनमध्ये घुसून वॉचमन गोकुळ संपत मडके (रा. गदेवाडी, ता. शेवगाव) यांना लाकडी दांडके व गजाने मारहाण केली. त्यानंतर ट्रान्सफॉर्मरची तोडफोड करून त्यातील सुमारे ९९० लिटर ट्रान्सफॉर्मर ऑइल व ५३० किलो कॉपर कॉईल असा सुमारे ९८ हजार २० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.





याप्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याच्या तपासासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करण्यात आले होते. तपासादरम्यान हा गुन्हा सराईत गुन्हेगार भिमा लक्ष्मण म्हस्के (रा. बीड) व त्याच्या साथीदारांनी केल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार शेवगाव शहराजवळील वरुर चौक येथे सापळा रचून संशयित वाहन अडवण्यात आले. त्यातील भिमा लक्ष्मण म्हस्के (वय ३८), अविनाश कल्याण धुरंधरे (वय ३७) व अमोल गणेश रांजवण (वय ३६, सर्व रा. बीड) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या कारची झडती घेतली असता १० किलो कॉपर कॉईल, तीन मोबाईल, चोरीसाठी वापरण्यात येणारे साहित्य तसेच गुन्ह्यात वापरलेली स्विफ्ट कार असा एकूण ५ लाख ७२ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दरम्यान, चौकशीत आरोपींनी चापडगाव येथील जिनिंग प्रेसमधील डी. पी. फोडून कॉपर कॉईल चोरी केल्याची कबुली दिली आहे. या प्रकरणात आणखी दोन साथीदारांचा सहभाग उघड झाला असून त्याबाबत स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुख्य आरोपी भिमा म्हस्केवर राज्यभरात ५० पेक्षा अधिक गुन्हे दाखल असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. ही कारवाई सहायक पोलीस निरीक्षक हरिष भोये, पोलीस उपनिरीक्षक महादेव गुट्टे, पोलीस अंमलदार फुरकान शेख, बाळासाहेब नागरगोजे, शाहिद शेख, आकाश काळे, बाळासाहेब खेडकर, किशोर शिरसाठ, भगवान धुळे व महिला पोलीस अंमलदार सोनल भागवत यांच्या पथकाने केली.

## स्वगणना करीत पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते अहिल्यानगर जिल्हा जनगणनेचा शुभारंभ

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

राष्ट्रीय जनगणनेला आजपासून महाराष्ट्रात सुरुवात झाली असून जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्वगणना करीत अहिल्यानगर जिल्ह्यातील जनगणनेचा शुभारंभ केला. या जनगणनेसाठी नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन पालकमंत्र्यांनी केले.

पोलीस कवायत मैदान येथे १ मे महाराष्ट दिनाच्या व कामगार दिनाच्या शासकीय ध्वजारोहण सोहळ्यानंतर स्वगणनेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे आदी उपस्थित होते.



यावेळी पालकमंत्र्यांनी टॅबवर स्वतःच्या घरगणनेसंबंधी असणाऱ्या सर्व ३४ प्रश्नांची उत्तरे भरली. स्वतःच्या घराची माहिती भरून 'सबमिट' बटनावर क्लिक केल्यावर त्यांचा 'सेल्फ एन्युमरेशन आयडी' तयार झाला. अशा पद्धतीने स्वतःच स्वतःची माहिती भरून पालकमंत्री महोदयांनी जिल्ह्यातील जनतेला स्वगणना करण्याचे आवाहन देखील केले.

दिनांक १ ते १५ मे हा स्वगणनेचा कालावधी असून त्यानंतर १६ मे ते १४ जून या कालावधीत घरोघरी जाऊन प्रगणकांमार्फत जनगणना केली जाणार आहे.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते व इतर अधिकाऱ्यांनीही आपली स्वगणना पूर्ण केली. तसेच, या जनगणना मोहिमेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले.

# 'डिफेन्स क्लस्टर'च्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्ह्याचा वेगवान विकास

## पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील । महाराष्ट्र दिन उत्साहात संपन्न

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

अहिल्यानगर जिल्हा आता 'डिफेन्स क्लस्टर'च्या माध्यमातून वेगाने विकसित होत असून, जिल्ह्यात नौदलाच्या संदर्भातील 'डिफेन्स मॅन्युफॅक्चरिंग' प्रकल्प उभा राहत आहे. संरक्षण मंत्र्यांच्या हस्ते लवकरच या प्रकल्पाचे उद्घाटन होणार असून, यामुळे जिल्ह्यातील युवकांना स्थानिक पातळीवरच मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होऊन त्यांच्या कुटुंबाला स्थैर्य मिळेल, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त अहिल्यानगर येथील पोलीस कवायत मैदानावर डॉ. विखे पाटील यांच्या हस्ते आज मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी महापौर ज्योती गाडे, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल यांची प्रमुख उपस्थिती होती.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, १ मे १९६० रोजी आपल्या राज्याच्या निर्मितीसाठी ज्या हुतात्म्यांनी बलिदान दिले, त्यांच्या प्रति राज्य शासन कृतज्ञ आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, राजर्षी शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा घेऊन राज्याची प्रगतीची घोडदौड सुरू आहे. आज कामगार दिन असून सर्व कष्टकरी बांधवांच्या योगदानाचाही त्यांनी गौरव केला.

२०२७ ची जनगणना ही स्वातंत्र्योत्तर पहिलीच 'डिजिटल' जनगणना असून नागरिकांनी 'स्वगणना' सुविधेचा लाभ घेऊन आपली अचूक माहिती नोंदवावी. ही प्रक्रिया देशाच्या विकासाची पुढील दिशा ठरवणारी असेल. तसेच 'डिजिटल इंडिया' संकल्पनेत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर असल्याचेही त्यांनी नमूद केले.

राज्याच्या विकासाचा आराखडा मांडताना डॉ. विखे पाटील यांनी 'विकसित महाराष्ट्र' या संकल्पनेवर भर दिला. ते म्हणाले, २०४७ च्या विकसित भारताच्या संकल्पासोबतच 'विकसित महाराष्ट्र' घडवणे हे आमचे ध्येय आहे. राज्याची अर्थव्यवस्था चार ट्रिलियन डॉलरपर्यंत नेऊन देशाला विकासाची दिशा देणारे महाराष्ट्र हे देशामध्ये प्रथम क्रमांकाचे राज्य ठरेल. यासोबतच आरोग्य सुविधा आणि कौशल्य विकासामध्येही आपला जिल्हा उल्लेखनीय कामगिरी करत असल्याचे त्यांनी सांगितले.

पर्यावरण व जलसंवर्धनाचा उल्लेख करताना त्यांनी 'गोदा ते नर्मदा दर्शन जलयात्रा' उपक्रमाची माहिती दिली. हजारो महिलांच्या सहभागातून गोदावरीच्या पवित्र जलाचे व मातीचे पूजन करून पाणी बचतीचा आणि राष्ट्रनिर्मितीचा संदेश देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. शेवटी, सर्वांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा देत त्यांनी विकसित महाराष्ट्राचे स्वप्न पूर्ण करण्याचा निर्धार व्यक्त केला.



मुख्य ध्वजारोहणाच्या या सोहळ्यास स्वातंत्र्यसैनिक, लोकप्रतिनिधी, अधिकारी- कर्मचारी, पत्रकार, नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# SPOT NEWS



## गुणवंत तांत्रिक कामगार पुरस्काराने निलेश भाकरे सन्मानित

**● कोपरगाव । वीरभूमी –**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) यांच्या नाशिक परिमंडळाच्या वतीने कोपरगाव (ग्रामीण) येसगाव कक्षाचे वरिष्ठ तंत्रज्ञ निलेश सर्जेराव भाकरे यांना महाराष्ट्र दिनानिमित्त सन २०२५-२६ चा गुणवंत तांत्रिक कामगार पुरस्कार नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे यांच्या हस्ते देण्यात आला. महावितरण कंपनीच्या कामकाजात निलेश भाकरे यांनी सातत्याने प्रामाणिकपणे आणि कुशलतेने काम करत उल्लेखनीय योगदान दिले आहे. वीज वितरण व्यवस्थेतील अडचणी सोडविणे, ग्राहकांना वेळेवर सेवा देणे तसेच तांत्रिक बाबींमध्ये अचूकता राखणे या बाबींमध्ये त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. हा पुरस्कार लाईन स्टाफसाठी सब-डिव्हिजनमधून एका उत्कृष्ट कर्मचाऱ्यास दिला जातो. त्यांच्या कार्यतत्परतेमुळे विभागाच्या प्रगतीला चालना मिळाली असून सहकाऱ्यांसाठी ते प्रेरणादायी ठरले आहेत. जागतिक कामगार दिन आणि महाराष्ट्र दिनाच्या पार्श्वभूमीवर त्यांचा हा सन्मान करण्यात आला असून, महावितरणच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले आहे. भविष्यातही कंपनीच्या सर्वांगीण प्रगतीसाठी ते याच समर्पणाने काम करतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. हा सन्मान मिळाल्याबद्दल कोपरगाव परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सहकारी कर्मचारी, मित्रपरिवार व नातेवाईकांनी त्यांना शुभेच्छा देत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी यश चिंतले आहे.

## प्रज्ञाशोध परीक्षेत ज्ञानसाधना गुरुकुलची दमदार कामगिरी; तीन विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

केडगाव येथील ज्ञानसाधना गुरुकुलने यंदाही स्पर्धा परीक्षांमध्ये



आपली शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध करत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. मंथन प्रज्ञाशोध, लक्षवेध प्रज्ञाशोध आणि सावित्रीबाई फुले प्रज्ञाशोध या विविध राज्यस्तरीय परीक्षांचे नुकतेच निकाल जाहीर झाले असून, या परीक्षेत गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश मिळवले आहे. यामध्ये स्वराज स्वप्नील परांडे या विद्यार्थ्याने तिन्ही परीक्षांमध्ये राज्यात १० वा क्रमांक मिळवत तालुक्यात प्रथम येण्याची उल्लेखनीय कामगिरी केली. तसेच ओंकार चेमटे याने राज्यात २८ वा व जिल्ह्यात २१ वा क्रमांक पटकावला. अदिराज धीरज कोतकर याने राज्यात ३४ वा क्रमांक मिळवून केंद्रात प्रथम येण्याचा मान मिळवला. या तिन्ही विद्यार्थ्यांच्या यशातून ज्ञानसाधना गुरुकुलने गुणवत्तेचा ठसा पुन्हा एकदा उमटला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांचे आई-वडील, शाळेतील शिक्षक तसेच मार्गदर्शन करणाऱ्या क्लासमधील शबाना शेख, सुवर्णा दाणी, पूर्वा ढोरसकर, नक्षत्रा ढोरसकर तसेच प्रा प्रसाद जमदाडे याचे मोलाचे योगदान लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## सोमवारी अहिल्यानगरच्या रंगभूमीवर 'ॲनिमल'चा थरार

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

शहरातील नाट्यप्रेमींसाठी एक खास पर्वणी ठरणार असून कबीर इव्हेंट्सच्या वतीने सोमवार, ४ मे रोजी रात्री ८:३० वाजता सावेडी येथील माऊली सभागृहात 'ॲनिमल' या बहुचर्चित मराठी नाटकाचे आयोजन करण्यात आले आहे. अश्वमी थिएटर्स निर्मित या नाटकात प्रमुख भूमिका साकारणारे सिद्धार्थ जाधव हेच निर्माते असून, नाटकाचे लेखन व दिग्दर्शन महेश मांजरेकर यांनी केले आहे. 'ॲनिमल' हे नाटक एका गावातून मुंबईत अभिनेता होण्याचे स्वप्न घेऊन आलेल्या 'दत्तू'च्या संघर्षमय प्रवासाची कथा मांडते. या नाट्यातून त्याच्या भावविश्वातील निरागसता, स्वप्नं, अपयश आणि वास्तवाचा सामना प्रभावीपणे उलगडतो. मराठी रंगभूमीवरील एकपात्री परंपरेला नवा आयाम देणारे हे नाटक प्रेक्षकांना वेगळा अनुभव देणारे ठरणार आहे. नाटकात केवळ संवादच नव्हे, तर नेपथ्य, प्रकाशयोजना, संगीत आणि मूक पात्रांच्या माध्यमातून कथानक अधिक जिवंत करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, 'दत्तू'च्या भूमिकेत सिद्धार्थ जाधव यांचा अभिनय प्रेक्षकांना थेट मनाला भिडणारा ठरतो. त्याच्या स्वप्नांचा प्रवास, त्यातील चढ-उतार आणि शेवटचा भावनिक टप्पा प्रेक्षकांना अंतर्मुख करणारा आहे.

# कोपरगाव शहर, व्यावसायिक व प्रवाशांची नेमकी गरज न ओळखता झालेले काम म्हणजे कोपरगाव बस स्थानक

### आमदार आशुतोष काळे | कोपरगाव बस डेपो परिसरात काँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ

**● कोपरगाव । वीरभूमी –**

डॉक्टरला पेशंटची नस ओळखता आली तर उपचार व्यवस्थित होतात आणि लोकप्रतिनिधींना जर नागरिकांची गरज ओळखता आली तर विकास व्यवस्थित होतो. मात्र कोपरगाव बसस्थानक उभारतांना कोपरगाव शहराचा विचार केला गेला नाही. छोट्या मोठ्या व्यावसायिकांना व्यवसायाच्या संधी देता येतील याचा विचार करण्यात आला नाही व प्रवाशांना चांगल्या प्रकारे सोयी सुविधा कशा देता येतील हे अपेक्षित असतांना याचा कुठेही विचार करण्यात आला नाही. त्यामुळे कोपरगाव शहर, प्रवाशी व व्यावसायिक यांची नेमकी गरज न ओळखता झालेले काम म्हणजे कोपरगाव बसस्थानक असल्याची कडवट टीका आमदार आशुतोष काळे यांनी मा.आ.कोल्हे यांचेवर नाव न घेता केली आहे.



आमदार आशुतोष काळे यांच्या प्रयत्नांतून मिळालेल्या ०५ कोटी रुपयांच्या निधीतून महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत कोपरगाव बस डेपो परीसरातील काँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ आमदार आशुतोष काळे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी बोलतांना ते पुढे म्हणाले की, मला जनतेने सेवा करण्याची संधी दिल्यानंतर कोपरगाव शहराच्या नागरिकांच्या, प्रवाशांच्या आणि बस आगाराच्या अडचणी लक्षात घेऊन मी निधी आणला. त्या निधीतून दक्षिण बाजूने व्यापारी संकुलाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे तर उत्तरेच्या बाजूने नवीन बस डेपोचे काम सुरू आहे. यावरच न थांबता भविष्यात इलेक्ट्रिक बसेसची वाढती संख्या लक्षात घेऊन या बसेस चार्जिंगसाठी आवश्यक असणारे चार्जिंग स्टेशन देखील कोपरगाव बस स्थानकासाठी मंजूर करून आणले आहे. चार्जिंग स्टेशनच्या कामात देखील अनंत अडचणी आल्या मात्र अडचणींवर मात करून काम वेगाने पुढे जात असून चार्जिंग स्टेशन, काँक्रिटीकरण व बस डेपोसाठी २० कोटीपेक्षा जास्त निधी दिला. मात्र दुसरीकडे बस स्थानकाच्या परीसरातील खड्यातून जातांना माझ्या गाडीचा फोटो दाखवता मग हे पाप कुणाचे असा कडवट सवाल आमदार आशुतोष काळे यांनी मा.आ.कोल्हे यांचे नाव न घेता यावेळी विचारला.

विकासाचे प्रश्न अडचणी अत्यंत असल्या तरी मला दिलेल्या संधीतून शक्य होईल तेवढ्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केला आहे आणि यापुढेही करणार आहे.मूलभूत गरजा आणि प्रश्न भरपूर आहेत परंतु यापलिकडे जाऊन रोजगार उपलब्धतेसाठी प्रयत्न करीत आहे. कोपरगाव शहरात अधिकचा रोजगार उपलब्ध होऊन जास्तीत जास्त नागरिक वास्तव्यासाठी व नवीन उद्योग व्यवसाय कोपरगाव शहरात तेव्हा येतील जेव्हा आपल्याकडे इन्फ्रास्ट्रक्चर व्यवस्थित असेल तरच उद्योग व्यवसाय येतील आणि जास्तीत जास्त नागरिक येतील.त्यामुळे उद्योग व्यवसायासाठी अपेक्षित इन्फ्रास्ट्रक्चर आणि नागरीकांना कोपरगाव शहरात येण्यासाठी आवश्यक सोयी सुविधा कशा निर्माण करता येतील यासाठी प्रयत्न करीत आहे. व्यापारी संकुल काम पूर्ण होत असून अजून एक मजला वाढवून मिळावा अशी मागणी केली आहे.ती मागणी पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.त्यासाठी माझा पाठपुरावा सुरू आहे. दुसऱ्या मजल्यावर जाण्यासाठी अडचणी येवू नये यासाठी लिफ्टचे प्रयोजन असून ते प्रत्यक्षात साकार होईल असा विश्वास आमदार आशुतोष काळे यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी बस आगार व्यवस्थापक अमोल बनकर, बस स्थानक व्यवस्थापक अमित हम्पे, महात्मा गांधी जिल्हा प्रदर्शन चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव धरमचंद बागरेचा, मनोहर कृष्णानी, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संचालक सुधाकर रोहोम, डॉ.चंद्रशेखर आव्हाड, सुरेश कातकडे, नगरसेवक मंदार पहाडे, हाजीमेहमूद सय्यद, राजेंद्र वाकचौरे, जनार्दन कदम, वाल्मिक लहिरे, विजय त्रिभुवन, इम्तियाज अत्तार, राहुल शिरसाठ, बाळासाहेब रुईकर, माजी नगरसेवक विरेन बोरावके, रमेश गवळी, फकीर कुरेशी, अजीज शेख, दिनकर खरे, शिवाजीराव खांडेकर, शिवाजीराव ठाकरे, चंद्रशेखर म्हस्के, सचिन परदेशी, जावेद शेख, डॉ. तुषार गलांडे, सचिन गवारे, मुकुंद भूतडा, सुनिल फंड, सागर आहेर, शुभम काळे, चंद्रकांत धोत्रे, अमित आगलावे, गणेश बोरुडे, शिवाजीराव कुऱ्हाडे, राजेंद्र जोशी, भाऊसाहेब भाबड, अंबादास वडांगळे, विकास बेंद्रे, प्रदीप कुऱ्हाडे, शुभम लासुरे, योगेश वाणी, राजेंद्र आभाळे, एकनाथ गंगुले, दिनेश संत, हारुण शेख, राजेंद्र फुलफगर, याकूब शेख, सुनिल गलांडे, तुकाराम काळे, सिद्धार्थ शेळके, बाळासाहेब बोर्डे, लहु सुपेकर, शुभम कानडे, नितेश बोरुडे, ठकाजी लासुरे, जुनेद शेख, संदिप सावतडकर, प्रथमेश वाकचौरे, मयूर राऊत, हर्षल कृष्णानी, राजेंद्र उशिरे, गणेश गोसावी, कैलास काळे, सुनिल वैरागळ, राजेंद्र पगारे, सोमाजी शिंदे, अविनाश शिंदे, संतोष दळवी, उमेश दीक्षित, प्रशांत मोरे, मयुरेश शिंदे, मंदार हिंगे, सुयोग ठोळे, रवींद्र राऊत, पप्पू देशमुख, तुषार साठे, संतोष बारसे, अभियंता बायजित पठाण, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अधिकारी,कर्मचारी आदी उपस्थित होते.

## अहमदनगर एज्युकेशन सोसायटी व जैन युवक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षकांमध्ये अवयवदान प्रबोधन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

शहरात जैन ओसवाल युवक संघाच्या वतीने आणि फेडरेशन ऑफ ऑर्गन अँड बॉडी डोनेशन यांच्या सहकार्याने अवयवदान प्रबोधन शिबिराचे आयोजन करण्यात आले. अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूलच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमात शिक्षकांमध्ये जनजागृती करून अवयवदानाचा संदेश घराघरांत पोहोचवण्याचे आवाहन करण्यात आले.

हा उपक्रम अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमास जैन ओसवाल युवक संघाचे अध्यक्ष भूषण भंडारी, फेडरेशन ऑफ ऑर्गन अँड बॉडी डोनेशनचे दीपक पापडेजा, डॉ. सतीश आहिरे, अएसो चे खजिनदार प्रकाश गांधी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी जॉयसचे मनीष बोरा, रोहित लुनिया, अमित शिंगवी, प्रीतम पोखरणा, आनंद कटारिया, संकेत गांधी, सचिन डागा, प्रोजेक्ट चेअरमन तेजस डागा यांच्यासह अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या सर्व शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

प्रास्ताविकात भूषण भंडारी यांनी अवयवदानाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, आजच्या काळात अवयवदान ही केवळ सामाजिक जबाबदारी नसून मानवतेची खरी सेवा आहे. एका व्यक्तीच्या अवयवदानामुळे अनेकांचे जीवन वाचू शकते. मात्र समाजातील चुकीच्या समजुती, रुढी व परंपरांमुळे अनेक नागरिक पुढे येत नाहीत. या गैरसमजुती दूर करण्यासाठी व्यापक जनजागृती आवश्यक असून, त्यासाठीच या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

यकृतदान करणाऱ्या निकिता गांधी यांनी आपल्या अनुभवातून उपस्थितांना भावनिक संदेश दिला. त्या म्हणाल्या, एखाद्याचे प्राण वाचवणे हे सर्वात मोठे पुण्य आहे. मृत्यूनंतर शरीर दफन किंवा दहन केले जाते, पण त्याच शरीरातील अवयवांनी अनेकांना नवे जीवन देता येते. अवयवांसाठी रुग्णांना अनेक वर्षे प्रतीक्षा करावी लागते. त्यामुळे प्रत्येकाने अवयवदानासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

## श्रीगोंद्याची वाटचाल आदर्श रस्ते तालुक्याकडे : १८ रस्त्यांचे सीमांकन लवकरच

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**



मुख्यमंत्री बळीराजा शेत- पाणंद रस्ते योजनेच्या अंमलबजावणीसाठी उपविभागीय अधिकारी कुमार चिंचकर यांच्या अध्यक्षतेखाली महसूल, भूमी अभिलेख व शिवपानंद चळवळीची संयुक्त बैठक पार पडली. तहसीलदार सचिन डोंगरे व राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील उपस्थित होते.

चळवळीच्या पाठपुराव्यामुळे तालुक्यात शेतरस्त्यांचे काम गतीने सुरू असून, श्रीगोंदा आदर्श रस्ते तालुका बनण्याच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे चिंचकर यांनी सांगितले. पुढील महिन्यात १८ रस्त्यांचे सीमांकन होणार आहे. कोथुळ-ढोरजे (काशी विश्वनाथ रोड) आदर्श रस्ता म्हणून निवडण्यात आला असून मुरूम टाकणे, मजबुतीकरण व वृक्षलागवड केली जाणार आहे. खुले केलेल्या रस्त्यांवर अतिक्रमण केल्यास गुन्हा दाखल व फार्मर आय डी ब्लॉक करण्याची कारवाई होणार असल्याचा इशाराही देण्यात आला. पावसाळ्यापूर्वी शेतकऱ्यांना रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी कालबद्ध नियोजन करण्यात आले आहे.

या बैठकीस नायब तहसीलदार मिलिंद जाधव, भूमी अभिलेख विभागाचे श्री. शिंगाडे, मोजणी अधिकारी वासुदेव पाटील, राज्य कायदे सल्लागार ॲड. अजय कडूस, राजेंद्र निळकंठ नागवडे, जालिंदर कातोरे, मच्छिंद्र पवार, रामचंद्र अडसरे, महेश पानसरे, विठ्ठल जरांगे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# जिल्ह्यात पाणीटंचाई भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरळीत

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

जिल्ह्यात वाढते तापमान व संभाव्य पाणीटंचाईची परिस्थिती लक्षात घेता जिल्हा प्रशासनाने व्यापक नियोजन करत पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबविल्या आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन शाखेमार्फत टंचाईग्रस्त भागांचे सूक्ष्म देखरेख करण्यात येत असून, कोणत्याही नागरिकाला पिण्याच्या पाण्याची कमतरता भासू नये यासाठी यंत्रणा दक्षतेने कार्यरत आहे.

दि. २९ एप्रिल २०२६ रोजीच्या अहवालानुसार जिल्ह्यातील एकूण ३४ गावे व १६२ वाड्या-वस्त्यांमध्ये पाणीटंचाईची स्थिती निर्माण झाली असून सुमारे ६४ हजार ५८६ नागरिकांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. या भागांसाठी एकूण ३० टँकर (४ शासकीय व २६ खासगी) कार्यरत असून संगमनेर, पारनेर व नगर या तालुक्यांमध्ये टंचाईचे प्रमाण अधिक असल्याने तेथे अनुक्रमे १०, १३ व ६ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे.

टँकरच्या खेपांबाबतही समाधानकारक प्रगती नोंदविण्यात



आली आहे. मंजूर ९०.९२ खेपांपैकी ८८ खेपा पूर्ण करण्यात आल्या असून हे प्रमाण सुमारे ९६.७९ टक्के आहे. यामुळे टंचाईग्रस्त भागांमध्ये पाणी वेळेत पोहोचत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

पाणीटंचाईवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्ह्यातील १२ विहिरी व बोअरवेलचे अधिग्रहण करण्यात आले असून त्यापैकी ३ जलस्त्रोत थेट गावांसाठी तर ९ टँकर भरण्यासाठी वापरण्यात येत आहेत. आवश्यकतेनुसार अतिरिक्त खाजगी जलस्त्रोत अधिग्रहित करण्याचे अधिकार संबंधित तहसीलदारांना देण्यात आले आहेत. संभाव्य टंचाईग्रस्त गावांसाठी आगाऊ कृती आराखडा तयार करण्यात आला असून टँकर प्रस्तावांना तात्काळ मंजुरी देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दरम्यान, वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर उष्णतेच्या लाटेचा सामना करण्यासाठी आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये ओआरएस व आवश्यक औषधांचा साठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच टँकरद्वारे पाणीपुरवठा करताना गळती किंवा पाण्याची चोरी होऊ नये यासाठी विशेष भरारी पथके नियुक्त करण्यात आली आहेत.

जिल्हा प्रशासनाने नागरिकांना पाण्याचा काटकसरीने व जबाबदारीने वापर करण्याचे आवाहन केले असून, पाणीपुरवठा व्यवस्थापनासाठी प्रशासन पूर्ण क्षमतेने कार्यरत असल्याचे स्पष्ट केले आहे.

# श्रीगोंदा रेल्वे स्थानकावरील राख व्यवहारावर न्यायालयाची दखल 'फ्लाय ॲश' प्रकरणात हरित लवादाची नोटीस

### कोट्यवधींच्या व्यवहारासह पर्यावरणीय हानीचे गंभीर प्रश्न

**■ विजय उंडे**

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

श्रीगोंदा रेल्वे स्थानक परिसरात सुरू असलेल्या दगडी कोळशाच्या राखेच्या (फ्लाय ॲश) वाहतूक व साठवणुकीच्या वादग्रस्त प्रकरणावर राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या पुणे खंडपीठाने गंभीर दखल घेतली आहे. या संदर्भात दाखल करण्यात आलेला मूळ अर्ज क्र. ५९/२०२६ न्यायाधिकरणाने ग्राह्य धरत संबंधित कंपन्यांना नोटीस बजावण्याचे आदेश दिले आहेत.

माननीय न्यायमूर्ती दिनेश कुमार सिंह (न्यायिक सदस्य) व डॉ. सुजित कुमार बाजपेयी (तज्ज्ञ सदस्य) यांच्या खंडपीठासमोर २३ एप्रिल रोजी झालेल्या सुनावणीत हा आदेश देण्यात आला. अर्जदार विठ्ठल बबन जंगले व इतरांनी केलेल्या अर्जात, प्रतिवादी वाय-श ट्रेडस्फिअर एलएलपी आणि शटेक (इंडिया) प्रा. लि. यांच्या विरोधात गंभीर पर्यावरणीय उल्लंघनांचे आरोप करण्यात आले आहेत.

या प्रकरणी बेकायदेशीर वाहतूक व परवानग्यांचा अभाव दिसून येत आहे. अर्जानुसार, मध्यप्रदेश व उत्तर प्रदेशातील औष्णिक वीज प्रकल्पांमधून येणारी फ्लाय ॲश ही भारतीय रेल्वेमार्फत श्रीगोंदा येथे आणली जात असून, जल व वायू प्रदूषण नियंत्रण कायदे तसेच धोकादायक कचरा व्यवस्थापन नियमांनुसार आवश्यक असलेल्या पूर्वपरवानग्या न घेता ही वाहतूक केली जात असल्याचा आरोप आहे. लिंपणगाव (ता. श्रीगोंदा) येथील गट क्रमांक ५४ मध्ये उभारलेल्या साठवण शेडमुळे अर्जदारांच्या शेतजमिनीला फटका बसत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. राखेचे कण पिकांवर साचणे, शेतात स्लरी/चिखल जाणे आणि धुळीमुळे होणारे वायुप्रदूषण यामुळे शेतीचे नुकसान झाल्याचा दावा अर्जात करण्यात आला आहे.

९ मार्च २०२६ पर्यंत सुमारे २,७६,००० टन फ्लाय ॲश बेकायदेशीर व अवैज्ञानिक पद्धतीने हाताळल्याचा आरोप करण्यात आला आहे. कांदा पिकाचे नुकसान झाल्याचे

### 'राखेचे सावट' की विकासाचा प्रश्न?

■ श्रीगोंदा परिसरासमोर उभा राहिलेला हा प्रश्न केवळ औद्योगिक व्यवहाराचा नसून, पर्यावरण, आरोग्य आणि शेती यांच्या समतोलाचा आहे. योग्य नियमन व जबाबदारीची अंमलबजावणी झाली नाही, तर या राख व्यवहाराचे परिणाम दीर्घकालीन व गंभीर ठरू शकतात, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

नमूद करत अर्जदारांनी अनुक्रमे १.५० लाख व ३.५० लाख रुपये नुकसानभरपाई मागितली आहे. यात हजारो टनांचा व्यवहार; कोट्यवधींचे अर्थकारण गुंतलेले आहे. स्थानिक माहितीप्रमाणे, दररोज सुमारे ५६ ते ५८ वॅगन असलेली मालगाडी श्रीगोंदा स्थानकावर दाखल होते. एका वॅगनमध्ये सुमारे ७० टन राख असते. म्हणजेच दररोज अंदाजे ४,००० ते ४,५०० टन राख येथे उतरवली जात आहे. अत्यल्प दराने खरेदी केली जाणारी ही राख पुढे वीटभट्ट्या, बांधकाम क्षेत्र आणि इतर उद्योगांना अधिक दराने विकली जात असल्याने या व्यवहारातून मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल होत असल्याची चर्चा आहे.

या राखेमूळे परिसरातील वाहतूक, रस्त्यांचे अतोनात नुकसान आणि सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. राख वाहतुकीसाठी हायवा, ट्रक, जेसीबी, पोकलेन यांचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. या वाहनांच्या सततच्या व वेगवान हालचालीमुळे रस्त्यांची दुरवस्था झाली असून, नागरिकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. रात्रीच्या वेळी गावोगावी सुरू असलेली ही वाहतूक स्थानिकांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे.



गंभीर बाब म्हणजे आरोग्य व पर्यावरणावर संकट ओढवले असून राखेमधील सूक्ष्म धूलिकण हवेत मिसळून नागरिकांच्या श्वसनमार्गात जात असल्याने दमा, ॲलर्जी, सर्दी-खोकला यांसारख्या आजारांमध्ये वाढ होत असल्याची तक्रार नागरिक करत आहेत. शेतीवरही त्याचा परिणाम जाणवत असून, जमिनीची सुपीकता कमी होणे, पिकांचे उत्पादन घटणे आणि पाण्याची गुणवत्ता खालावणे असे परिणाम दिसून येत आहेत. राख उडू नये म्हणून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा वापर केला जात असल्याने जलस्रोतांवरही ताण येत आहे.

या प्रकरणाची सुरुवात गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात स्थानिक पातळीवरील जनजागृतीतून झाली. दैनिक वीरभूमी या वृत्तपत्रामधून सातत्याने हा मुद्दा मांडल्यानंतर नागरिक व शेतकरी पुढे सरसावले आणि अखेर त्यांनी न्यायालयात अर्ज दाखल केला. इतक्या मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या या व्यवहाराबाबत प्रशासन, पर्यावरण विभाग आणि संबंधित यंत्रणांकडून ठोस कारवाई दिसून न आल्याने त्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

न्यायाधिकरणाने या प्रकरणात पर्यावरणासंबंधी गंभीर प्रश्न उपस्थित झाल्याचे नमूद करत अर्ज स्वीकारला असून, सर्व प्रतिवादींना चार आठवड्यांत उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी २३ जून २०२६ रोजी होणार आहे. तक्रारदारांचे वकील म्हणून पुणे येथील हरित लवाद न्यायालयाचे ॲड. तानाजी गंभीरे हे काम पाहत आहेत.

# SPOT NEWS



## राष्ट्रीय विक्रम प्रित्यर्थ माणिकर्णीका हिचा देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते गौरव

**अकोले । वीरभूमी –**

बाल वयात हिमालयाच्या शिखरांना साद घालणे. त्यावरील गिर्यारोहणाची चढाई यशस्वीरित्या पार करणे हे निश्चितच कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. त्रंबकेश्वर येथे जलसंपदा खात्याच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या गोदा ते नर्मदा कलश यात्रा शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमप्रसंगी येथील सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटी संचालित शिशु विहार मराठी माध्यमाची विद्यार्थिनी माणिकर्णिका प्रवर देशपांडे हिला विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. वयाच्या अवघ्या सहाव्या वर्षी उत्तराखंड राज्यातील १२,५०० फूट उंचीवरील केदारकंठ हे हिमशिखर तिने नुकतेच सर केले. एवढ्या कमी वयात सर्व आव्हानांचा सामना करत हिमशिखर सर करून माणिकर्णिका हिने राष्ट्रीय विक्रम रचला आहे. त्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने तिचा सत्कार दि. २५ रोजी करण्यात आला. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. माणिकर्णिका ही आहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील हिंदसेवा मंडळ संचालित मॉडर्न हायस्कुलचे माजी प्राचार्य स्व. अनंतराव देशपांडे यांची पणती तर शिरीष व चंद्रशेखर देशपांडे यांची नात आहे. कार्यक्रमास अन्न पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, गिरीश महाजन, महापौर हिमगौरी आडके, उपमहापौर विलास शिंदे, स्वामी समर्थ गुरुकुल पिठाचे अण्णासाहेब मोरे, होळकर वंशाचे राजे यांसह मान्यवर उपस्थित होते.

## नील क्रांती चौकात बुद्ध पौर्णिमेनिमित्त सरबत वाटप

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

बुद्ध पौर्णिमे निमित्त शहरातील दिल्ली गेट येथील नील क्रांती चौक येथे अरविंद साळवे मित्र मंडळाच्या वतीने सरबत वाटपाचा सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडला. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना दिलासा देण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना थंडगार सरबत वाटून मानवतेचा संदेश दिला. या वेळी अरविंद साळवे, चेतन साळवे, आनंद साळवे, भावेश साळवे, महेश भोसले, अशोक पारधे, गणेश पाखरे, हेमंत साळवे, गिरीश जाधव, सलीम शेख, भगवान साळवे, साजीद सय्यद, अन्सार शेख, वृषाल साळवे, प्रबुद्ध कांबळे, राहुल साळवे, संदेश भोसले, जाफर बेग, सुशांत शिरसाठ आदी उपस्थित होते. या उपक्रमाच्या माध्यमातून बुद्धांच्या विचारांचा प्रसार करत समाजात बंधुता, समता आणि सेवा भावना रुजविण्याचा संदेश देण्यात आला.

## आरपीआय (आठवले) युवक कार्याध्यक्षपदी अजय बडोदे

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) नगर शहर युवक कार्याध्यक्षपदी अजय बडोदे यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली. युवक जिल्हाध्यक्ष अमित काळे यांच्या हस्ते बडोदे यांना नियुक्तीपत्र प्रदान करून त्यांचा सत्कार करण्यात आला. या नियुक्ती सोहळ्याच्या प्रारंभी मार्केटयार्ड चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी युवक जिल्हा सचिव गौतम कांबळे, युवक नगर तालुका सरचिटणीस निखिल सुर्यवंशी, उपाध्यक्ष अजय पाखरे, चंद्रशेखर पंचमुख, विजय शिरसाठ, दीपक भिंगारदिवे, संदीप शिरसाठ, कृष्णा गाडेकर, मंगेश ससाने, गणेश गाडेकर, गहीनाथ आजबे, अमर बडेकर, प्रशांत पवार, निखिल गणेश सुर्यवंशी, प्रताप कराळे, सोहेल शेख, गोविंद जगदाळे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. युवक जिल्हाध्यक्ष अमित काळे म्हणाले की, रिपब्लिकन पक्षाची विचारधारा ही सामाजिक न्याय, समता आणि बंधुता यावर आधारित आहे. आजच्या तरुणांनी या विचारांना आत्मसात करून समाजात सकारात्मक बदल घडवून आणणे गरजेचे आहे. अजय बडोदे हे सामाजिक कार्यात सक्रिय व युवकांमध्ये चांगले संघटन असलेले कार्यकर्ते असून त्यांच्या नियुक्तीमुळे नगर शहरात युवक संघटना अधिक सक्षम होईल.

# दत्त मंदिर संस्थेचा आध्यात्मिक-सामाजिक कार्य गौरव सोहळा उत्साहात

### निःस्वार्थ सेवेतून संस्थेची प्रगती; दादाजी वैशंपायन यांच्या कार्याचा मान्यवरांकडून गौरव

**शेवगाव । वीरभूमी –**

अहंकार विरहित व निःस्वार्थ भावनेने कोणत्याही संस्थेचे कार्य केले, तर त्या संस्थेची प्रगती निश्चित होते. परमपूज्य दादाजी वैशंपायन यांच्या सानिध्याने सुरू असलेले दत्त मंदिर संस्था व गुरुदत्त सामाजिक, सांस्कृतिक, कला व क्रीडा संस्थेचे कार्य तालुक्यासाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन गुरुवर्य हरिभक्त परायण राम महाराज झिंजुर्के यांनी केले.

शेवगाव येथे गुरुदत्त सामाजिक, सांस्कृतिक, कला व क्रीडा संस्थेच्या वतीने आयोजित आध्यात्मिक व सामाजिक कार्य गौरव पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते.

यावेळी जगदंबा ट्रस्ट, देऊळगाव राजा चे संस्थापक परमपूज्य प्रा. मुकुंदनाथ आंधळे महाराज यांनीही संस्थेच्या कार्याचे कौतुक करताना, परमपूज्य दादाजी वैशंपायन यांच्या आशीर्वादाच्या लहरी आजही या परिसरात जाणवतात. समाजात आध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्यांचा गौरव करून संस्था त्यांना नवे बळ देते, असे सांगितले.



गेल्या २६ वर्षांपासून कार्यरत असलेल्या या संस्थेच्या वतीने दरवर्षी समाजातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना गौरविण्यात येते. यंदा सोळाव्या वर्षी आयोजित या पुरस्कार सोहळ्यात आध्यात्मिक कार्य गौरव पुरस्कार परमपूज्य नरेंद्रनाथ महाराज, श्रीनाथ शक्तिपीठ, अकोला यांना प्रदान करण्यात आला. तर सामाजिक कार्य गौरव पुरस्कार निवासी उपजिल्हाधिकारी अमरावती तथा शेवगावचे भूमिपुत्र संतोष काकडे, अमरावती येथील मतीनजी भोसले आणि सेवानिवृत्त अप्पर पोलीस अधीक्षक मुकुंद हातोटे (कोकण विभाग, ठाणे) यांना देऊन सन्मानित करण्यात आले.

याच कार्यक्रमात परमपूज्य योगतज्ञ दादाजी वैशंपायन भक्तनिवासाचे भूमिपूजनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष अर्जुनराव फडके, सचिव फुलचंद रोकडे व सर्व कार्यकर्त्यांनी कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन माजी प्राचार्य दिलीप फलके यांनी केले, तर आभार प्रदर्शन निवृत्ती गोरे यांनी मानले.

या प्रसंगी नगराध्यक्षा मायाताई मुंढे, अरुण मुंढे, पाथर्डीचे नगराध्यक्ष अभय आव्हाड, नंदकुमार शेळके, डॉ. महेंद्र गौशाल, रवींद्र पुसाळकर, उपअभियंता प्रल्हाद पाठक, संजय फडके, आरती पवार, डॉ. संजय लाड, डॉ. बाळासाहेब मुरदारे यांच्यासह बन्सी पांगरे, जनार्दन हारके, पी. बी. शिंदे, किसनराव माने, लक्ष्मण काळे, बंडू भोर, अभय पालवे, प्राचार्य कुलकर्णी, सुरेश घुले आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुरस्कारप्राप्त मान्यवरांच्या मनोगतानंतर आरती व महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## संजीवनी ज्यु. कॉलेजची अंजली साळुंके इ. १२ वीत ९३ टक्के गुण मिळवुन सर्व प्रथम

**कोपरगाव । वीरभूमी–**

महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा इयत्ता १२ वीचा जाहिर झाला असुन यात संजीवनी ज्युनिअर कॉलेजच्या कॉमर्स विभागच्या अंजली ईश्वर साळुंके हिने शेकडा ९३ टक्के गुण मिळवुन महाविद्यालयात सर्व प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होवुन आपल्या प्रतिभा सपन्नतेचे दर्शन घडविले. संजीवनी ज्यु. कॉलेजमध्ये कॉमर्स शाखेचे शिक्षण हे इंग्रजी मध्ये दिले जाते, तरी सुध्दा अंजली हीने उच्चांकी गुण मिळवत संजीवनी मधिल दर्जा व गुणवत्तेची मोहर उमटवली आहे. यंदाही संजीवनीच्या कॉमर्स व सायन्स शाखेने १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे, अशी माहिती संजीवनी ज्यु कॉलेजने प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

पत्रकात पुढे म्हटले आहे की महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने या परीक्षा फेब्रुवारी व मार्च २०२६ मध्ये घेतल्या होत्या. कॉमर्स शाखेत ओम अजय बजाज याने ९०.५० टक्के गुण मिळवुन दुसऱ्या क्रमांकाचा मानकरी ठरला. रिध्दी धनंजय रोहम हिने ८९.१७ टक्के गुण मिळवुन तृतिय क्रमांक मिळविला. क्षितिजा शांतीलाल होन हिने ८८.५० टक्के व विनाशा सचिन गुजराथी हिने ८५.५० टक्के गुण मिळवुन अनुक्रमे ४ था व ५ वा गुणानुक्रमांक प्राप्त केला. सायन्स शाखेत शौर्य संतोष थोरात याने ८७ टक्के गुण मिळवुन प्रथम क्रमांक मिळविला. समृध्दी विजय शेळके व वैभव नारायण लचके यांनी अनुक्रमे ८३.३३ व ८२.३३ टक्के गुण मिळवुन दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाने उत्तिर्ण झाले.

सर्व गुण संपन्न विद्यार्थी घडविणे हेच संजीवनी ज्युनिअर कॉलेजचे प्रमुख ध्येय असून त्या दृष्टीने येथे विद्यार्थ्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्व विकसित केले जात आहे. शैक्षणिक गुणवत्तेसोबतच नैतिक मूल्ये, शिस्त, कौशल्य विकास आणि सामाजिक जाणीव यांचा समतोल साधत विद्यार्थ्यांना सक्षम बनविले जात आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी संस्थेचे व्यवस्थापन कोणत्याही प्रकारची तडजोड न करता सातत्याने प्रयत्नशील आहे. याचे स्पष्ट प्रतिबिंब विविध उपक्रम, सुविधा आणि शैक्षणिक उपक्रमांमधून प्रकर्षाने दिसून येते.

विद्यार्थ्यांच्या या यशाबध्दल संजीवनीचे अध्यक्ष नितिनदादा कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे व संचालिका डॉ. मनाली कोल्हे यांनी सर्व गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले आहे. तसेच हेड ऑफ अकॅडमिक गव्हर्नंन्स डॉ. रावसाहेब शेंडगे, प्राचार्या रेखा साळुंके यांचेही अभिनंदन केले.

## श्रमिकनगरला कामगार दिनानिमित्त फडकला लाल झेंडा

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

श्रमिकनगरला विडी कामगारांच्या उपस्थितीमध्ये कामगार दिवस साजरा करण्यात आला. श्रमिक हाऊसिंग सोसायटी, लालबावटा विडी कामगार युनियन व आयटक संघटनेच्या वतीने कामगार चळवळीचा प्रतिक असलेला लाल झेंडा फडकविण्यात आला.

मार्कंडेय विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष अशोक सब्बन यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी श्रमिक जनता नगर सोसायटीचे चेअरमन विलास सग्गम, सेक्रेटरी शंकर येमूल, सहसेक्रेटरी दत्तात्रय भीमनाथ व सर्व पदाधिकारी तसेच माजी अध्यक्ष बाळकृष्ण सिद्दम, राजू म्याना, भीमराज कोडम, बालाजी मंदिराचे अध्यक्ष विनोद म्याना, तसेच मार्कंडेय विद्यालयाचे मुख्याध्यापक शशीकांत गोरे, मुख्याध्यापिका विद्या दगडे, विडी कामगार युनियनच्या उपाध्यक्षा कॉ. भारती न्यालपेल्ली, कॉ. सगुणा श्रीमल, कॉ. संगीता कोंडा, कॉ. भाग्यलक्ष्मी गड्डम, कॉ. पूजा न्यालपेल्ली आदींसह शिक्षक व शिक्षतेतर कर्मचारी आणि विद्यार्थी तसेच श्रमिकनगर मधील सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.



अशोक सब्बन यांनी कामगार दिनाची माहिती देऊन, कम्युनिस्ट पक्षाच्या झेंड्याखाली आपण किती लढे करून हक्क मिळवले याचा आढावा घेतला. ते म्हणाले की, मोठ्या संघर्षानंतर कामगारांनी आपला हक्क मिळवला आहे. महिला-पुरुष कामगारांमधील भेदभाव नाहिसा झाला. पूर्वी भांडवलदार वर्ग कामगारांना गुलामासारखे राबवत होते. मात्र कामगार कायद्यासाठी मोठा उठाव करावा लागला. आजही कामगारांचे हक्क अबाधित ठेवण्यासाठी संघटितपणे संघर्ष करावा लागणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कॉ. भारती न्यालपेल्ली म्हणाल्या की, कामगार दिवस हा सर्व कामगार आपल्या हक्कासाठी एकजुट होण्याचा संदेश देत आहे. कामगार दिनाचा हा प्रदीर्घ इतिहास लक्षात घेताना घटत चाललेला रोजगार आणि वाढत चाललेली महागाई याचा विचार करण्याची नितांत गरज आहे. आज अर्थव्यवस्था केवळ भांडवलदार केंद्रीत बनली आहे. यासाठी पुन्हा संघटितपणे संघर्ष करण्याची वेळ आली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी उपस्थितांनी महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

# वारकरी संत आणि सुफी संतांच्या विचारांतच मानवतेचे कल्याण

### ह.भ.प धर्मकिर्ती महाराज परभणीकर | जमाअत - ए- इस्लामी हिंद, कब्रस्तान मस्जिद मध्ये वैचारिक जागर

**पारनेर । वीरभूमी–**

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. येथे वारकरी संप्रदायातील संतांनी आणि मुस्लिम सुफी संतांनी आपल्या कार्यातून केवळ भक्तीचाच नव्हे, तर समता, बंधुता आणि मानुसकीचा मार्ग दाखवला आहे. आजच्या काळात सामाजिक ऐक्य टिकवून ठेवण्यासाठी या दोन्ही परंपरांच्या विचारांची मोठी गरज आहे, असे परखड मत प्रसिद्ध प्रबोधनकार ह.भ.प. धर्मकिर्ती महाराज परभणीकर यांनी व्यक्त केले. ते जमाअत ए इस्लामी हिंद पारनेर कब्रस्तान मज्जिद येथे आयोजित वैचारिक जागर प्रबोधन प्रसंगी आयोजित विशेष प्रवचन सोहळ्यात 'वारकरी संत आणि सुफी परंपरा : एक सामाजिक अनुबंध' या विषयावर ते बोलत होते.



ह.भ.प. धर्मकिर्ती महाराज यांनी आपल्या ओघवत्या शैलीत वारकरी आणि सुफी संतांच्या शिकवणीतील साम्य अधोरेखित केले. ते म्हणाले की, जगद्गुरु तुकाराम महाराज जेव्हा अखिल मानवजातीच्या कल्याणाचा विचार मांडतात. तसाच विचार सुफी संतांनी 'मोहब्बत' आणि 'खिदमत-ए-खल्क' (मानवतेची सेवा) या माध्यमातून दिला आहे. वारीतील भगवा झेंडा आणि सुफी दर्ग्यांवरील संदेश हे दोन्हीही द्वेष मिटवून प्रेमाची पेरणी करण्याचे काम करतात. संतांनी कधीही माणसांत भेदभाव केला नाही, मग आपण का करावा? असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला.

> भारतीय समाज मनाला आकार देण्यास संतांची भक्ती आणि सुफींची सुफीझम या दोन विचार धारांनी मोलाची भूमिका बजावली आहे. महाराष्ट्रातील संत परंपरा आणि सूफी परंपरा या दोन्हीचा मूळ आधार माणुसकी हाच आहे. त्यांनी जात, धर्म आणि पंथांच्या भिंती ओलांडून विठ्ठल आणि अल्लाह यांना मानवी रूपात पाहिले आहे. दोन्ही प्रवाहांनी कर्मकांडापेक्षा अंत शुद्धीला महत्व दिले. समाजातील द्वेष दूर करून प्रेमाचा संदेश देणे हेच दोन्ही विचारधारांचे साध्य आहे. आधुनिक काळात जाती धर्म विरहित समाज घडविण्यासाठी संतांची हि समतेची शिकवण आजही दीप स्तंभासारखी मार्गदर्शक आहे.
>
> **– डॉ. रफिक सय्यद,** संत साहित्याचे गाढे अभ्यासक

महाराजांनी आपल्या भाषणात संत नामदेव महाराज आणि सुफी संत शेख महंमद बाबा यांच्या कार्याचा विशेष उल्लेख केला. 'शेख महंमद अविंध, त्याचे हृदयी गोविंद' या उक्तीप्रमाणे महाराष्ट्रात हिंदू-मुस्लिम संस्कृती शतकानुशतके गुण्यागोविंदाने नांदत आली आहे. हीच संस्कृती खऱ्या अर्थाने भारताची ताकद असल्याचे त्यांनी सांगितले. सध्याच्या काळात सोशल मीडिया आणि इतर माध्यमातून समाजात पसरवल्या जाणाऱ्या द्वेषाला बळी न पडण्याचे आवाहन त्यांनी तरुणांना केले. जर आपण ज्ञानेश्वरी आणि सुफींचे तत्वज्ञान नीट समजून घेतले, तर समाजात कधीही तेढ निर्माण होणार नाही. माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागणे, हाच खरा धर्म आहे, असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाच्या शेवटी महाराजांनी उपस्थित जनसमुदायाला सामाजिक सलोखा राखण्याची शपथ दिली. या प्रबोधनपर सोहळ्यामुळे परिसरात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले असून, महाराजांच्या या भूमिकेचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

## गट नंबर चार येथील अतिक्रमण हटवून सुसज्ज व सुशोभित क्रीडांगण मिळावे यासाठी आनंद वर्पे व वैभव वर्पे यांचे उपोषण सुरु

**संगमनेर । वीरभूमी –**

संगमनेर तालुक्यातील चिकणी येथील गावातील मुलांना मैदानी खेळ खेळण्यासाठी ग्राम पातळीवर चांगली क्रीडांगण असावी या मागणीसाठी संगमनेर तालुक्यातील चिकणी येथील ग्रामस्थांनी व गावातील तरुणांनी उपविभागीय अधिकारी, गटविकास अधिकारी व तहसीलदार यांना पत्र देऊन सरकारी गट नंबर ४ मधील २ हेक्टर क्षेत्राची मागणी केली होती मात्र ग्रामपंचायतीने या क्षेत्रावरील अतिक्रमणे काढून क्रीडांगणाची जागा मोकळी करून देण्यासाठी दिलेली एक महिन्याची मुदत दिलेली होती मात्र एक महिना पूर्ण होऊ नये ग्रामपंचायत कडून कुठली कारवाईक झाली नाही त्यामुळे संगमनेर तालुका किसान (शेतकरी शेतमजूर) काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आनंद निवृत्ती वर्पे व वैभव रावसाहेब वर्पे यांच्या नेतृत्वाखाली आज शुक्रवार दिनांक १ मे २०२६ पासून चिकणी ग्रामपंचायत कार्यालयासमोर ग्रामपंचायत प्रशासनाच्या विरोधात अमरण उपोषण करण्याचे ठरवले आहे.



याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात आनंद वर्पे यांनी म्हटले आहे की, संगमनेर तालुक्यातील चिकणी गावठाण शिवारात गावातील मुलांना खेळण्यासाठी सुशोभित क्रीडांगण असावे अशी ग्रामस्थांची इच्छा आहे. त्यासाठी ग्रामपंचायतीकडे महाराष्ट्र शासनाच्या मालकीचा सरकारी गट नंबर ४ मधील जागेची मागणी करण्यात आली होती. या सरकारी जागेवर मोठ्या प्रमाणात अनधिकृत अतिक्रमणे करण्यात आली आहे. ही अतिक्रमण काढण्याची विनंती ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीकडे तसेच तहसीलदार व गट विकास अधिकारी यांच्याकडे करीत वेळोवेळी पाठपुरावा केलेला आहे. तसेच सदर गट नंबरची मोजणी देखील झालेली आहे मात्र अद्यापही सदर अतिक्रमण न काढल्याने क्रीडांगणाचे काम सुरू होत नाही.

याबाबत आमरण उपोषणाचा इशारा दिल्यानंतर ग्रामपंचायतीने २५ मार्च २०२६ रोजी आनंद वर्पे व ज्ञानेश्वर वर्पे यांना पत्र देऊन आपल्या मागणीप्रमाणे मोजणी फी भरली आहे तसेच क्रीडांगणासाठी २ हेक्टर क्षेत्राची मागणी ग्रामपंचायतीने तहसील कार्यालय मार्फत केली आहे. सदर प्रस्तावाची पोहोच घेतली आहे तरी १ महिन्यामध्ये पुढील सर्व पूर्तता करण्यात येईल असे आश्वासन देत सदरचे उपोषण स्थगित करण्याची विनंती केली होती मात्र तो कालावधी उलटूनही परिस्थितीत जैसे थे असल्याने स्थानिक प्रशासनाकडून अतिक्रमण काढून क्रीडांगणासाठी जागा मोकळी करून द्यावी अशी मागणी निवेदनाद्वारे गट विकास अधिकारी यांना केली आहे. अन्यथा ग्रामस्थांनी आज दिनांक १ मे पासून चिकणी ग्रामपंचायत कार्यालयासमोर प्रशासनाच्या विरोधात आमरण उपोषण करण्याचा निर्धार केला आहे या पहिल्या दिवशी चांगला प्रतिसाद मिळाला असं गावातील तरुण व ग्रामस्थ यांनी या उपोषणाला पाठिंबा दिला आहे जोपर्यंत मागणी पूर्ण होत नाही तोपर्यंत सर्वच राहणार असल्याचे उपोषणकर्त्यांनी सांगितले आहे.

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाची यशाची उज्ज्वल परंपरा कायम; विज्ञान शाखेचा ९८.०३% निकाल

**श्रीगोंदा । वीरभूमी–**

कष्टाला जिद्दीची जोड मिळाली की यश निश्चित मिळते, या उक्तीचा प्रत्यय पुन्हा एकदा श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाने आपल्या उत्कृष्ट निकालातून दिला आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या बारावीच्या परीक्षेच्या निकालात महाविद्यालयाने आपली उज्ज्वल परंपरा कायम राखत शैक्षणिक क्षेत्रात भक्कम कामगिरी नोंदवली आहे.

विशेषतः विज्ञान शाखेने तब्बल ९८.०३ टक्के निकाल लावत यशाचे शिखर गाठले आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध शाखांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले असून, यंदाही मुलींनी आघाडी घेतल्याचे दिसून आले. विज्ञान शाखेतील मानसी विलास ढवळे हिने ९२.५०% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. वाणिज्य शाखा - वैष्णवी अशोक गावडे हिने ९०.५०% गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. (एकूण निकाल : ९०.२०%), कला शाखा - ऋतुजा घोलप भोसले हिने ७०.५०% गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला. (एकूण निकाल : ८३.२०%).

याशिवाय महाविद्यालयाच्या उच्च व्यावसायिक अभ्यासक्रम (MCVC) विभागानेही उल्लेखनीय कामगिरी करत ९६.५५% निकाल नोंदवला आहे. इलेक्ट्रॉनिक्स विभाग - १००% निकाल हॉर्टिकल्चर विभाग - १००% निकाल क्रॉप सायन्स विभाग - ९३.७५% निकाल लागला आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राजेंद्रद नागवडे तसेच जिल्हा बँकेच्या संचालिका अनुराधा नागवडे यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश आगामी पिढीसाठी प्रेरणादायी आहे, असे त्यांनी नमूद केले. यावेळी उपाध्यक्षा मेघाताई औटी, प्राचार्य डॉ. सतिषचंद्र सूर्यवंशी, निरीक्षक सचिन लगड, उपप्राचार्य प्रा. चंद्रभान कातोरे, पर्यवेक्षक प्रा. प्रवीण टकले तसेच सर्व विश्वस्त मंडळ यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### करिअर कट्टा उपक्रमाचा लाभ

महाविद्यालयाची गौरवशाली परंपरा यंदाही कायम राहिली असून, येथे राबविण्यात येणाऱ्या 'करिअर कट्टा' उपक्रमाच्या माध्यमातून दरवर्षी शेकडो विद्यार्थ्यांना पोलीस व इतर शासकीय सेवांमध्ये संधी मिळत आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच शिस्तबद्ध वातावरणामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थीदेखील स्पर्धेत अव्वल ठरू शकतात, हे महाविद्यालयाने पुन्हा सिद्ध केले आहे.

वीरभूमी

हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# 'ग्रीन सिटी'सारख्या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाची व्यापक चळवळ उभारणे आवश्यक

## पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील । 'ग्रीन सिटी' मोहिमेअंतर्गत वृक्षलागवड उपक्रमाचा शुभारंभ

**● अहिल्यानगर । वीरभूमी –** शहरे झपाट्याने विस्तारत असताना वाढते प्रदूषण नागरिकांच्या जीवनावर गंभीर परिणाम करत आहे. बदलत्या जीवनशैलीची मोठी किंमत समाजाला मोजावी लागत असून, वैद्यकीय सर्वेक्षणांतूनही प्रदूषणामुळे विविध आजारांचे प्रमाण वाढत असल्याचे स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर 'ग्रीन सिटी'सारख्या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाची व्यापक चळवळ उभारणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

साईद्वारका सेवा ट्रस्ट आणि अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त आयोजनाने 'ग्रीन सिटी' मोहिमेअंतर्गत एका वर्षात एक लाख वृक्षलागवडीच्या उपक्रमाचा शुभारंभ पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या हस्ते शहरातील माऊली सभागृह येथे झाला. यावेळी महापौर ज्योती गाडे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, तसेच महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, वाढती वाहतूक, वाहनांची वाढती संख्या, वेगाने उभ्या राहत असलेल्या वसाहती आणि पर्यावरणाकडे होणारे दुर्लक्ष यामुळे शहरातील प्रदूषणात लक्षणीय वाढ होत आहे. याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असून, या समस्येकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. 'ग्रीन सिटी' हा उपक्रम या पार्श्वभूमीवर अत्यंत उपयुक्त ठरणार असून, शहराच्या सर्वांगीण विकासात हरित क्षेत्राचा समतोल राखणे अत्यावश्यक आहे.

ते पुढे म्हणाले, केवळ वृक्षलागवड करून थांबणे पुरेसे नाही, तर त्या वृक्षांचे संगोपन आणि संवर्धन करणे अधिक महत्त्वाचे आहे. वृक्षलागवड कार्यक्रमापुरती मर्यादित न राहता ती कायमस्वरूपी व्हावी, यासाठी सर्वांनी जबाबदारीने पुढाकार घेणे आवश्यक आहे. प्रत्येक भागात 'ग्रीन स्पेसेस' विकसित करण्याबरोबरच शहराच्या रचनेत पर्यावरणपूरक बदल करणे ही सद्यकाळाची निकड आहे.

राज्यात जलसंपदा विभागामार्फत सुमारे पाच हजार एकर जमीन अतिक्रमणमुक्त करण्यात आली असून, जलस्रोतांचे संरक्षण करण्यासाठी विविध उपाययोजना राबविल्या जात आहेत. नद्यांमधील वाढते प्रदूषण ही चिंतेची बाब असून, पाण्याच्या प्रदूषणावर नियंत्रणासाठी ठोस उपाय योजणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

पर्यावरण विषयक लोकशिक्षणाची चळवळ उभारणे अत्यावश्यक असून, त्यातून नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण होण्यास मोठी मदत होईल, असेही ते म्हणाले. शहराचे नियोजन दीर्घकालीन दृष्टिकोनातून केले जात असून, आधुनिक व शाश्वत विकासाला प्राधान्य दिले जात आहे. शहर अधिक स्मार्ट बनविण्यासोबतच 'क्लीन अँड ग्रीन सिटी' ही संकल्पना प्रत्यक्षात आणणे हे प्रशासनाचे उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी नमूद केले.



उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी प्रास्ताविकामध्ये 'ग्रीन सिटी' मोहिमेबाबत माहिती दिली. मोहिमेत सहभागी स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींचा पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास विविध संस्थांचे पदाधिकारी, प्रतिनिधी, विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ऐतिहासिक बंध पुन्हा दृढ होण्याच्या दिशेने

## पानिपतच्या वीरांचे वंशज रोड मराठ्यांचा महाराष्ट्र दौरा

**● श्रीगोंदा । वीरभूमी –** महाराष्ट्र आणि हरियाणा यांना जोडणाऱ्या इतिहासातील एक अत्यंत भावनिक आणि गौरवशाली अध्यायाला नव्याने उजाळा देणारी एक महत्त्वपूर्ण घडामोड घडत आहे. तिसरे पानिपत युद्धामध्ये पराक्रम गाजवणाऱ्या मराठा वीरांच्या वंशजांचा सध्या हरियाणातील पानिपत येथील रोड मराठा समाजाचा महाराष्ट्र दौरा सुरू होत आहे.

अखिल भारतीय मराठा जागृती मंच, पानिपत (हरियाणा) यांच्या वतीने पानिपत महाराष्ट्र संपर्क अभियान या यात्रेचे आयोजन करण्यात आले असून, संस्थापक सदस्य या ऐतिहासिक प्रवासासाठी रवाना झाले आहेत. १७६१ मध्ये महाराष्ट्रातून उत्तरेकडे गेलेले लाखो मराठा सैनिक पानिपतच्या रणांगणावर लढले. अनेक वीर शहीद झाले, तर काही जिवंत राहिलेले योद्धे यमुना नदीच्या परिसरात स्थायिक झाले. आज त्याच वीरांचे वंशज रोड मराठा म्हणून ओळखले जातात. ही यात्रा केवळ भेट नाही, तर इतिहासातील तुटलेले नाते पुन्हा जिवंत करण्याचा एक प्रयत्न आहे. महाराष्ट्राशी असलेले सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि रक्ताचे नाते दृढ करण्यासाठी ही मोहीम राबवली जात आहे.

या अभियानाची सुरुवात जळगाव येथून होणार असून, पुढील काही दिवसांत धुळे, चाळीसगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, श्रीगोंदा, मंचर, पुणे, सातारा आणि कोल्हापूर या शहरांना भेटी दिल्या जाणार आहेत. या दौऱ्यात रोड मराठ्यांचा इतिहास, त्यांची परंपरा आणि पानिपत युद्धाशी असलेला संबंध याविषयी जनजागृती करण्यात येणार आहे.



या प्रतिनिधी मंडळात मंचाचे संस्थापक व कोर कमिटी सदस्य राजेश कल्याण, कृषीपाल कसबरे, भागासिंग बाळदे, सुरजीत महाले, कृष्णा कल्याण यांचा समावेश असून, राष्ट्रीय समन्वयक म्हणून कोल्हापूरचे मिलिंद पाटील देखील सहभागी होणार आहेत.

### श्रीगोंद्यात विशेष कार्यक्रम...

■ ५ मे रोजी ही टीम श्रीगोंदा शहरात आगमन करणार असून, दिल्ली वेस आणि इतर पानिपत वारसा स्मारकांना भेट देणार आहे. तसेच शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनच्या सदस्यांशी संवाद साधून इतिहासाची देवाणघेवाण केली जाणार आहे. याशिवाय म्हातार पिंप्री येथील सरदार जानराव वाबळे यांच्या समाधीस्थळालाही भेट दिली जाणार आहे. शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेश इंगळे यांनी सर्व श्रीगोंदेकर नागरिकांना या ऐतिहासिक भेटीस उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# गाडगेबाबा साहित्य संमेलनातील 'माय स्टँप' उपक्रमाची पोस्ट विभागाकडून दखल

## २८ पुरस्कारार्थींची खास टपाल तिकिटे । पुणे रिजन पोस्ट ऑफिसकडून आयोजकांचे कौतुक

**● शिर्डी । वीरभूमी –** राष्ट्रसंत गाडगेबाबा मराठी साहित्य संमेलन दि. २६ एप्रिल रोजी शिर्डी येथील हॉटेल जे. के. पॅलेस येथे मोठ्या उत्साहात पार पडले. या संमेलनात महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यातून साहित्यिकांनी हजेरी लावली. संमेलनापूर्वी महाराष्ट्रभरातील शंभराहून अधिक वर्तमानपत्रांनी केलेल्या वार्तांकनामुळे संपूर्ण राज्यात या संमेलनाचा मोठ्या प्रमाणात प्रचार-प्रसार झाला.

या संमेलनात दोन कवी संमेलने, कथाकथन, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या व्यक्तींना राष्ट्रसंत डेबूजी संत गाडगेबाबा सन्मान पुरस्कार, तसेच साहित्यरत्न, समाजरत्न, शिक्षकरत्न, कविरत्न, ग्रामसेवारत्न आणि उद्योगरत्न पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. या पुरस्कार सोहळ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे संमेलनाध्यक्ष साही. राजेंद्र फंड यांच्या संकल्पनेतून 'माय स्टँप' उपक्रमांतर्गत पुरस्कारार्थींची खास टपाल तिकिटे तयार करण्यात आली. गाडगेबाबा मूर्ती व सन्मानचिन्हांसह ही टपाल तिकिटे देण्यात आल्याने या उपक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. त्यामुळे वर्तमानपत्रे, व्हॉट्सअ‍ॅप व फेसबुकद्वारे या उपक्रमाची मोठ्या प्रमाणात चर्चा झाली.

एकाच वेळी 'माय स्टँप' अंतर्गत २८ व्यक्तींची टपाल तिकिटे काढण्यात आली. भारतीय डाक विभागाचे इन्स्पेक्टर श्री. अनंत सोनवणे व श्री. योगेश शेजवळ यांच्या उपस्थितीत या टपाल तिकिटांचे समारंभपूर्वक विमोचन करण्यात आले.

या उपक्रमाची बातमी वर्तमानपत्रांमधून राहाता व कोपरगाव येथील पोस्ट ऑफिसमार्फत पुणे रिजन ऑफिस (डायरेक्टरेट ऑफ पोस्ट ऑफिस) येथे पोहोचली. त्यानंतर उच्चस्तरीय डी.पी.एस. अधिकारी श्री. अभिजित बनसोडे तसेच पी.एम.जी. अधिकारी श्रीमती प्रीती अग्रवाल यांनी संमेलनातील सर्व उपक्रमांची तसेच 'माय स्टँप' अंतर्गत सन्मानित करण्यात आलेल्या व्यक्तींची सविस्तर माहिती मागवली.

तसेच संमेलनाध्यक्ष व डेबूजी प्रतिष्ठानचे संस्थापक राजेंद्र फंड, अध्यक्ष सुनील निकम, कवी सरकार, तसेच आयोजक माधवराव देसाई, सुधाकर वाघ, अनिल देसाई, विलासराव रोकडे आणि सौ. राजश्री फंड यांचे अभिनंदन करण्यात आले.

# लाचलुचपतची पाथर्डीच्या दोन पोलिस कर्मचाऱ्यांवर कारवाई

**● पाथर्डी । वीरभूमी –** नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने पाथर्डी पोलीस ठाण्यात सापळा रचून पोलीस हवालदार अभयसिंह काकासाहेब लबडे याला ५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडल्याची कारवाई बुधवारी सायंकाळी करण्यात आली. या कारवाई दरम्यान घेतलेली रक्कम त्याने सहकारी पोलीस शिपाई ज्ञानेश्वर मारूती सानप याच्याकडे दिल्यानंतर सानप हा पळून जाण्यात यशस्वी झाला.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिकच्या पथकाने ही कारवाई केली.एका नागरिकाकडून वाहन सोडवून देणे व दाखल गुन्ह्यात मदत करण्याच्या मोबदल्यात ७ हजार रुपयांची लाच मागण्यात आल्याची तक्रार प्राप्त झाली होती. त्यानुसार पथकाने पडताळणी करून सापळा रचला.तडजोडीनंतर ५ हजार रुपये स्वीकारण्याचे ठरल्यानंतर पाथर्डी पोलीस ठाण्यातच कारवाई करण्यात आली. पंचांच्या उपस्थितीत पावडर लावलेल्या नोटा देण्यात आल्या. त्या नोटा हवालदार लबडे यांनी स्वीकारल्या. मात्र संशय आल्याने त्यांनी ती रक्कम शिपाई सानप याच्याकडे दिल्याचे समोर आले. पथकाने धाड टाकताच शिपाई सानप हा मागील दरवाजातून पळून गेला. या प्रकरणी पोलीस हवालदार अभयसिंह काकासाहेब लबडे व पोलीस शिपाई ज्ञानेश्वर मारूती सानप यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम मधील कलम व तसेच भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, अटक करण्यात आलेल्या हवालदार लबडे याला न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून फरार सानप याचा तपास सुरू आहे.

# गुणवंतांचा सन्मान म्हणजे गुणवत्तेचा व उद्याच्या उज्ज्वल भविष्याचा सन्मान : आ. काळे

**● कोपरगाव । वीरभूमी–** शिक्षणात गुणवत्ता हाच प्रगतीचा खरा पाया आहे. रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाने शैक्षणिक दर्जा आणि गुणवत्तेच्या बाबतीत आपला वेगळा ठसा उमटवला असून हे यश प्राचार्य शाखाप्रमुख गुणवंत शिक्षक आणि रयत सेवकांच्या सांघिक प्रयत्नांचे फळ आहे म्हणून गुणवंतांचा सन्मान म्हणजे गुणवत्तेचा व उद्याच्या उज्ज्वल भविष्याचा सन्मान आहे असे प्रतिपादन उत्तर विभागाचे विभागीय चेअरमन आमदार आशुतोष काळे यांनी समन्वय समितीच्या व्यासपीठावरून केले.

रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाच्यावतीने आयोजित 'समन्वय समिती सहविचार व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ' प्रसंगी अध्यक्षीय भाषणात आमदार आशुतोष काळे बोलत होते. ते पुढे म्हणाले की, रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.खासदार शरदचंद्र पवारसाहेब यांचे विचार काळाच्या पुढे असतात व त्यामुळेच संस्था डिजिटल झाली आहे. मा.चेअरमन चंद्रकांत दळवी साहेब, व्हा. चेअरमन ड.भगीरथ शिंदे आणि विभागीय मॅनेजिंग कौन्सिल यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तर विभाग गेली पाच सहा वर्षे भौतिक सुविधा व गुणवत्तेत प्रथमस्थानी आहे आणि हीच परंपरा आपण यापुढे पण सातत्याने पुढे घेऊन जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीपूर्वी रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील व रयत माउली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करण्यात आली. मान्यवरांचे स्वागत विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे आणि सहायक विभागीय अधिकारी बाबासाहेब नाईकवाडी यांनी केले. प्रास्ताविक करतांना नवनाथ बोडखे यांनी शैक्षणिक भौतिक व मूलभूत सुविधांची तपशीलवार मांडणी केली. आजच्या स्पर्धेचा गुणवता हा एकमेव मापदंड समोर ठेवून विभागचे चेअरमन व विभागीय व्यवस्थापन कमिटीच्या मार्गदर्शनाखाली कामकाज करीत आहे. गुणवत्तेमुळेच विद्यार्थी संख्या वाढत आहे.शिक्षकांची पदे रिक्त असतांनाही शैक्षणिक कामकाजाचा अतिरिक्त भार शाखाप्रमुख व शिक्षक शिक्षिका सहन करीत आहेत.संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली विभागातील प्रत्येक वर्ग खोलीमध्ये इंटरॅक्टिव्ह पॅनल बोर्ड बसवण्यात आपण यशस्वी झालो आहोत. गुणवत्ता कक्षाच्या माध्यमातून आपण विविध स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून दहा कोटी पेक्षा अधिक शासकीय शिष्यवृत्ती प्राप्त केली आहे. यात विभागीय चेअरमन आमदार आशुतोष काळे साहेब यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असल्याचे त्यांनी सांगितले.

या बैठकीपूर्वी रयत शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन मंडळाच्या सदस्या श्रीम. मीनाताई जगधने यांना श्रीरामपूर शहर भीमोत्सव समितीतर्फे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला त्याबद्दल त्यांचा ॲड. भगीरथ शिंदे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी सभेला संबोधित करताना व्हा. चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे म्हणाले की, जेव्हा गुणवत्ता



बोलू लागते, तेव्हा प्रगतीचे नवे मार्ग प्रशस्त होतात. उत्तर विभागाचा हा सन्मान सोहळा विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल गुणवत्ता कक्षाचे काटेकोर नियोजन व पाठपुरावा यामुळेच हे यश मिळाले असल्याचे त्यांनी सांगितले.

उत्तर विभागातील ज्या शाखांनी शैक्षणिक वर्षात उत्कृष्ट कामगिरी केली आहे अशा गुणवंत शाखांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी शिक्षक यांचा गुणगौरव करण्यात आला. प्रसंगी विभागीय गुणवत्ता कक्ष मार्गदर्शक काकासाहेब वाळुंजकर यांच्यासह व गुणवंत शिक्षकांचा गौरव करून त्यांना प्रोत्साहित करण्यात आले. व्हा. चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे यांनी विभागीय कामकाजाचे कौतुक केले व अडचणींना सामोरे जात आपण पुढे जाणार आहोत. जागतिक पातळीवर शिक्षणात झपाट्याने बदल होत आहेत व रयत ही एकमेव संस्था आहे जी परिवर्तनशील आहे व यापुढेही संस्थेचे अध्यक्ष खा. शरदचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कामकाज करणार आहोत.

याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष अरुण कडू, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दादाभाऊ कळमकर, जनरल बॉडी सदस्य बाबासाहेब भोस, कुंडलिकराव दरेकर, ज्ञानदेव पांडुळे, इंजि. अनिल साळुंखे, प्रा. ए. टी. पोकळे, संदीप वर्षे, सचिव शिवाजी भोर, पद्माकांत कुदळे, मोहन काकड, अण्णासाहेब शेलार, कारभारी आगवन, मनोज कवडे, सुरेश बोळीज तसेच विभागातील शाखांचे प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक, समन्वय समितीचे सदस्य व लाईफ मेंबर्स पालक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुधीर साबळे आणि मंजूश्री धीवर यांनी सूत्रसंचालन केले तर सहाय्यक विभागीय अधिकारी प्रमोद तोरणे यांनी आभार मानले.

# नागरीकांनी जनगणना प्रक्रियेत सक्रीय सहभाग नोंदवावा

## आ. आशुतोष काळे । महाराष्ट्र दिनानिमित्त कोपरगाव तहसील कार्यालयात ध्वजारोहण

**● कोपरगाव । वीरभूमी–** मतदार संघात महाराष्ट्र दिन आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा कारण्यात आला. महाराष्ट्र दिनानिमित्त कोपरगाव तहसील कार्यालयाच्या प्रांगणात आमदार आशुतोष काळे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात ध्वजारोहण संपन्न झाले.

यावेळी आमदार आशुतोष काळे यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांना आदरांजली वाहिली. महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा देतांना ते म्हणाले की, महाराष्ट्र दिन हा केवळ उत्सव नाही, तर आपल्या एकतेचा, परिश्रमाचा आणि प्रगतीचे प्रतीक आहे. आपला महाराष्ट्र ही संतांची, शूर वीरांची आणि कष्टकरी जनतेची भूमी आहे. या भूमीने आपल्याला खूप काही दिले असून राज्याच्या प्रगतीसाठी हातभार लावणे हि आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. शिक्षण, उद्योग, शेती आणि सामाजिक विकास या सर्व क्षेत्रांमध्ये महाराष्ट्राने देशात अग्रस्थान मिळवले असून ही प्रगती कायम ठेवण्यासाठी युवकांनी पुढाकार घेतला पाहिजे. आपल्या राज्याला अधिक सक्षम, समृद्ध आणि प्रगत बनवण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रित प्रयत्न करू असे सांगत त्यांनी सर्व नागरिकांना महाराष्ट्र दिनाच्या व आंतरराष्ट्रीय कामगार दिनाच्या शुभेच्छा देवून राज्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि महाराष्ट्राला आर्थिक, समाजिक आणि औद्योगिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले.

यावेळी शासकीय अधिकारी, बी.एस. एन.एल. चे संचालक रवीकाका बोरावके, महात्मा गांधी जिल्हा प्रदर्शन चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव धरमचंद बागरेचा, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संचालक सुधाकर रोहोम, नगरसेवक मंदार पहाडे, राजेंद्र वाकचौरे, हाजीमेहमूद सय्यद, वाल्मिक लहिरे, विजय त्रिभुवन, इम्तियाज अत्तार, जनार्दन कदम, बाळासाहेब रुईकर, सोमेश आढाव, माजी नगरसेवक विरेन बोरावके, फकीर कुरेशी, दिनकर खरे, शिवाजीराव खांडेकर, डॉ. चंद्रशेखर आव्हाड, शिवाजीराव ठाकरे, सचिन गवारे, डॉ. तुषार गलांडे, शुभम काळे, सुनिल फंड, मुकुंद भूतडा, राजेंद्र आभाळे, राजेंद्र जोशी, चंद्रकांत धोत्रे, सचिन परदेशी, अरुण त्रिभुवन, विकास बेंद्रे, ठकाजी लासुरे, सुशांत घोडके, उमेश दिक्षित, वैभव कानडे, विनोद गांगवे, प्रशांत मोरे, शिवाजी कवडे, सचिन चोळके, शंकर घोडेराव आदींसह नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### जनगणना प्रक्रियेत सक्रीय सहभाग नोंदवावा

■ १६ व्या जनगणनेला १ मे पासून सुरुवात होणार असून हि जनगणना दोन टप्यात होणार आहे. सुरुवातीला घर गणना व त्यानंतर जनगणना होणार आहे. जनगणनेत देखील दोन टप्पे असून एक पहिला टप्पा स्वगनणा हि पूर्णपणे डिजिटल स्वरुपात असून नागरिकांना मोबाईलवर स्वतःची माहिती घरबसल्या अधिकृत पोर्टलवर भरावयाची आहे. व दुसरा टप्पा प्रगणक घरोघरी येवून जनगणना करणार आहे. डिजिटल स्वरुपात स्वगनणा करण्यासाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून या पोर्टलवर नागरीकांनी आपली माहिती अचूक भरावी. जनगणना अचूक असेल तर शासनाला अनेक योजना राबवितांना त्याची मदत होते. ज्या नागरीकांना डिजिटल स्वरुपात असणारी जनगणना प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही त्यांची डिजिटल जनगणना प्रगनकाकडून करण्यात येईल त्यांनी काळजी करू नये. शासनाचा कोणताही विभाग असो समाजोपयोगी योजना आखतांना नागरिकांची व लाभार्थींची संख्या अत्यंत गरजेची असते. जनगणना अतिशय महत्वाची असून कोपरगाव मतदार संघातील नागरीकांनी या जनगणना प्रक्रियेत सक्रीय सहभाग नोंदवावा.

**– आ. आशुतोष काळे**